||| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)**

# विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/वि.वि/१४१ /२०२५ दि.०१/०८/२०२५

**प्रति,**

**१) मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख**
**कबचौउमविशी संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था**

**२) मा. संचालक / विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा - विभाग यांना**

**विषय:- विद्यार्थी विकास अधिकारी यांच्या नियुक्तीबाबत...**

महोदय / महोदया,

विद्यार्थी विकास अधिकाऱ्याच्या माध्यमातून विद्यार्थीभिमुख उपक्रमांचे आयोजन व्हावे, त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळावी, विद्यार्थ्यांमधील कलावंताला प्रोत्साहन मिळावे, विद्यार्थ्यांच्या सामाजिक व भावनिक समस्या समजून घेऊन त्यांना गरजेनुसार मार्गदर्शन व समुपदेशन करुन त्यांच्यातील उद्योन्मुख नेतृत्व घडविण्यासाठी प्रयत्न करावे, अशी विद्यार्थी विकास अधिकारी यांच्या नियुक्तीमागील प्रेरणा व हेतू आहे. विद्यार्थ्यांसाठी असलेले विविध उपक्रमाचे यश हे जसे विद्यार्थ्यांच्या सहभागावर अवलंबून असते तसे ते विद्यार्थी विकास अधिकाऱ्यांच्या सक्रियतेवर व विद्यार्थीभिमुख दृष्टिकोनावर सुध्दा अवलंबून असते. म्हणून आपल्याकडे अधिनियम तरतूदीतील कक्ष निर्माण होणे व विद्यार्थी विकास अधिकारी असणे गरजेचे आहे.

उपरोक्त बाब लक्षात घेता मा.प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख यांनी विद्यार्थी विकास अधिकारी यांची माहिती आपल्या महाविद्यालय / मान्यता प्राप्त परिसंस्थेत / विभागात नियुक्त करावयाच्या विद्यार्थी विकास अधिकारी / सहा. विद्यार्थी विकास अधिकारी (महिला / पुरुष) यांना विद्यार्थी विकास विभागाच्या पोर्टलवर असलेला (SDO Approval) हा अर्ज भरुन त्यांची प्रिंट काढुन त्यावर स्वत:ची स्वाक्षरी व मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख यांची स्वाक्षरी घेवून अर्ज तसेच सोबत त्या प्राध्यापकांचे विद्यापीठाने (व्याख्याता मान्यता विभागाकडुन मिळालेली) दिलेल्या मान्यतेची प्रत अपलोड करणेबाबत सुचित कराण्यात यावे. खालील निकषाच्या आधारे विद्यार्थी विकास अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी.

१) आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या ५०० पर्यंत असेल तेथे एक **विद्यार्थी विकास अधिकारी** व एक **सहायक महिला विद्यार्थी विकास अधिकारी** यांची नियुक्ती करावी. तसेच विद्यार्थी संख्या ५०० पेक्षा अधिक असेल तेथे एक **सहायक विद्यार्थी विकास अधिकारी** यांची नियुक्ती करावी.

२) एखाद्या विद्यार्थी विकास अधिकाऱ्याचा सलग तीन वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झालेला असेल तर त्यांना पुन्हा केवळ एका वर्षासाठी पुर्ननियुक्ती देता येईल, मात्र त्यास संचालक, विद्यार्थी विकास यांची मान्यता असणे आवश्यक असेल. **एखाद्या प्राध्यापकाकडे राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S. Programme Officer) कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C. Officer) अधिकारी व क्रीडा संचालक (Director of Sports) अशी जबाबदारी असेल तर त्यांची विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून नियुक्ती करता येणार नाही.** अशाप्रकारे नियुक्ती केली असल्यास ती तातडीने रद्द करावी, अन्यथा अशी नियुक्ती ग्राह्य धरली जाणार नाही.

**३) कबचौउमवि अंतर्गत केवळ महिलांसाठी असलेल्या मान्यता प्राप्त महाविद्यालये किंवा परीसंस्था/ विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/ विभाग यांनी विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून महिला प्राध्यापकाची व पुरुष प्राध्यापकास सहायक विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून नियुक्ती करणे आवश्यक राहील.**

**४)** विद्यार्थी विकास अधिकाऱ्याचा कार्य कालावधी सलग तीन वर्षे राहील. त्यात त्यांनी विद्यार्थी विकासाच्या उपक्रमात प्रशिक्षक म्हणून जबाबदारी सांभाळणे आवश्यक राहील. **तीन वर्षाच्या कालावधीत त्यांनी एकदाही "संघ व्यवस्थापक" म्हणून जबाबदारी पार पाडली नसेल, तर त्यांना विद्यापीठामार्फत प्रमाणपत्र दिले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.**

५) विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागांतर्गत विविध योजना उदा.कमवा व शिका, युवती सभा (विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा व स्वयंसिध्दा अभियान), नियतकालीक स्पर्धा, विद्यार्थी परिषद सदस्य व सचिव निवड प्रक्रिया, युवारंग, स्नेहसंमेलन, विविध स्पर्धा, कार्यशाळा, कृतीसत्रे यांच्या आयोजन-संयोजन व समन्वयाची जबाबदारी विद्यार्थी विकास अधिकारी यांची राहील. याकामी त्यांनी मा.प्राचार्य / संचालक यांचे वेळोवळी मार्गदर्शन घेणे आवश्यक राहील. विद्यापीठाच्या एखाद्या योजनेची वा उपक्रमाची जबाबदारी मा.प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख गरजेनुसार एखाद्या महिला/पुरुष प्राध्यापकांवर जबाबदारी सोपवू शकतील. मात्र त्यांनी सुध्दा विद्यार्थी विकास अधिकाऱ्यांच्या समन्वयाने कार्यभार सांभाळणे व त्याचा अहवाल, हिशेब विद्यार्थी विकास अधिकारी / प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख यांच्या स्वाक्षरीने सादर करणे आवश्यक राहील.

**६) विद्यापीठाने मान्यता दिलेल्या विद्यार्थी विकास अधिकाऱ्यास त्याच्या विद्यार्थीभिमुख कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, युवती सभा व युवक महोत्सव संघ सहभाग व इतर उपक्रमातील योगदानाबद्दल प्रती वर्ष विद्यार्थी विकास अधिकारी यांना रु.३०००/- आणि सहायक विद्यार्थी विकास अधिकारी (महिला / पुरुष) यांना रु.१०००/- मानधन व तीन वर्षाच्या कालावधीनंतर प्रशस्तीपत्र दिले जाईल. मात्र त्यासाठी दरवर्षी त्यांनी केलेल्या कार्यक्रमाचा विस्तृत अहवाल, विद्यार्थ्यांच्या उपक्रमातील सहभाग, छायाचित्रे वा इतर अनुषंगिक कागदपत्रे सत्यप्रतींसह दरवर्षी ३१ मार्च पर्यंत आपल्या शिफारशीसह विद्यापीठ कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.**

७) विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून एखाद्या प्राध्यापकाचा कार्यकाळ पूर्ण झाला असेल तर त्यांची विद्यार्थी विकास मंडळ सल्लागार समितीमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात यावी, जेणेकरुन त्यांचा विद्यार्थी उपक्रमांशी सातत्याने संपर्क राहील व उपक्रम अमंलबजावणीत त्यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरुशकेल.

नव्याने नियुक्त केलेल्या प्राध्यापकास विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून ऑनलाईन पध्दतीने भरलेले मान्यता मिळण्याचा प्रस्ताव, विद्यापीठाची प्राध्यापक म्हणून मान्यता असलेल्या पत्राची सत्यप्रत (University Approval letter) व कार्यभार हस्तांतर (Charge handover letter) पत्राची सत्यप्रत असा सविस्तर प्रस्ताव विद्यार्थी विकास विभागाकडे **दि. ८ जुलै,२०२५** पर्यंत किंवा तत्पुर्वी विद्यार्थी विकास विभागात पाठवावा . विद्यापीठाच्या मान्यतेनंतरच आपल्या विद्यार्थी विकास उपक्रमाच्या अनुदानाची रक्कम वा अग्रीम पाठविला जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे, धन्यवाद !

आपला विश्वासू,

(डॉ.जयेंद्र दि. लेकुंरवाळे)
**संचालक, विद्यार्थी विकास**

टिप - **१) विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून सन २०२४-२५व २०२५-२६ पर्यंत मान्यता असल्यास नवीन प्रस्ताव पाठवू नयेत.**

२) विद्यार्थी विकास अधिकाऱ्यांची नियुक्ती केली नसल्यास त्यांना विद्यापीठाच्या कोणत्याही विद्यार्थी विकास योजनेचा लाभ देता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.